रविवार, दि. २७ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# बदनापुरात शिक्षण विरुद्ध विकृतीचा संघर्ष!

**जालना । प्रतिनिधी -** शैक्षणिकदृष्ट्या विकसित होत असलेल्या बदनापूर शहरात एका ग्रामपंचायतीने नव्याने प्रस्तावित कला केंद्र प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर शहरात चर्चेची लाट उसळली आहे. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट असून, या केंद्राच्या आडून अश्लील कार्यक्रम किंवा वेश्यावृत्तीला खतपाणी घालण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बदनापूर परिसरात २० पेक्षा अधिक शाळा, ५-७ उच्च शिक्षण संस्था, औषधनिमर्ाण, कृषी, समाजकार्य महाविद्यालये, अशा प्रकारची शैक्षणिक घडी तयार झाली आहे. अनेक वर्षांपासून प्रा. डॉ. दत्ताभाऊ पाथरीकर यांच्यापासून ते भाजप आमदार नारायण कुचे यांच्या प्रयत्नातून शिक्षण क्षेत्रात बदनापूरने विशेष स्थान निर्माण केलं आहे. मात्र, बेकायदेशीर मद्य विक्री, बार, आणि कथित देहविक्रीच्या वाढत्या घटना शैक्षणिक वातावरणाला गालबोट लावत असल्याचा आरोप पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जातोय.

या नव्या कला केंद्राच्या नावाखाली भविष्यात नाचगाणी, अश्लील कार्यक्रम किंवा वेश्यावृत्ती यांना प्रोत्साहन मिळू शकते, अशी शंका स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. काही नागरिकांनी यावर ग्राम पंचायतीच्या ना हरकत प्रमाणपत्रावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

शहरात आधीच २५ हून अधिक बियर बार, परमिट रूम्स ॆशिपश्रू कार्यरत असल्याचं बोललं जातं. त्यामुळे पालक वर्गामध्ये भीती निर्माण झाली असून, शहर शिक्षणासाठी सोडायचं की सावत्र संस्कृतीसाठी? असा गंभीर प्रश्न विचारला जातोय. या सर्व पार्श्वभूमीवर या व्यवसायांना राजकीय आश्रय कोणाचा? आणि पोलीस प्रशासन कारवाई का करत नाही? हे दोन गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. बदनापूरच्या महाविद्यालय परिसरात या स्वरूपाचे उद्योग सुरू असणं, हे आमदारांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करतंय, कारण संबंधित शिक्षणसंस्था त्यांच्या मालकीच्या असल्याचं बोललं जातं.

जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे या कणखर महिला नेत्याच्या नेतृत्वात असतानाही, या गोरखधंद्यांना आळा बसत नसेल, तर हा प्रकार गंभीर असून, प्रशासकीय पातळीवर तातडीने कारवाई होण्याची आवश्यकता नागरिक व्यक्त करत आहेत.

शहराची ओळख शिक्षण हब म्हणून निर्माण होत असताना, जर तेच शिक्षण बकालतेच्या सावटाखाली येणार असेल, तर बदनापूरचे भावी शैक्षणिक आणि सामाजिक आरोग्य धोक्यात येऊ शकते. कला केंद्र हा सांस्कृतिक प्रकल्प ठरेल की आंबटपणाचा अड्डा, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

## कला हवी, पण संस्कृतीसह!

शहरामध्ये कला केंद्र हवंच, पण ते शैक्षणिक संस्कारांस पूरक आणि सृजनशीलता वाढवणारं असावं. नाहीतर 'कला'च्या नावाखाली सुरु होणारी 'कळा' समाजाच्या मनावर कायमचं ओरखडा उमटवेल.

## राजकीय आश्रयाची शंका; पोलिसांचे मौन

बरेचदा असे प्रकार प्रशासकीय दुर्लक्ष, पोलीस यंत्रणेचा शिथिलपणा आणि राजकीय आशीर्वादामुळेच उभे राहतात. आमदारांचे स्वतःचे महाविद्यालय त्या परिसरात असताना, त्यांची भूमिका स्पष्ट होणं आवश्यक आहे. आणि पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्यासारख्या कणखर महिला नेत्यांकडूनही अपेक्षा आहे की यात तातडीने लक्ष घालावे.

## विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात?

शहरात आधीच अनेक बार, परमिट रूम्स उघडपणे कार्यरत आहेत. त्यात भर म्हणून जर देहविक्रीचे अड्डे निर्माण होत असतील, तर विद्यार्थ्यांचे नैतिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्य धोक्यात येणार हे निश्चित.
शहरात शैक्षणिक विकासाची हवा वाहत असताना, तिच्यात छमछमचा कर्कश आवाज मिसळणं दुर्दैवीच आहे.

जालना शहराच्या अंबड रोडवर कार्यरत असलेल्या एका विवादित कला केंद्रात रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या कथित सांस्कृतिक कार्यक्रमांवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. स्थानिक नागरिकांनी यावर गंभीर आक्षेप घेत संबंधित केंद्रावर अनैतिक वर्तन आणि पोलिसांच्या मूक समर्थनाचा आरोप केला आहे. सदर केंद्रात रात्री उशिरापर्यंत गोंगाट, नाचगाणी आणि अन्य संशयास्पद हालचाली सुरू असल्याचे बोलल्या जात असले तरी पोलीस विभागाच्या फिरत्या पथक हे घटनास्थळी उपस्थित राहून चहा-पाण्याचा आस्वाद घेतात. त्याहून आश्चर्य म्हणजे, वरिष्ठ कार्यालय - विशेषतः पोलीस अधीक्षक कार्यालयातून पथकाची चौकशी केल्यास 'गाडी सामनगाव येथे आहे' अशी खोटी माहिती देण्यासाठी वाहन चालकांला सांगितल्या जाते. सूत्रांच्या म्हणण्यानुसार पथकातील काही पोलिसांचे कॉल रेकॉर्ड व मोबाईल लोकेशन तपासल्यास हे नेहमीच त्या भागात का फिरकतात, याचं नेमकं उत्तर मिळू शकते. प्रशासनाकडे त्याची मागणी जोर धरत आहे. हे कला केंद्र सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आहे की कुठल्यातरी आडमार्गाच्या व्यावसायासाठी?, पोलीस यंत्रणा याकडे दुर्लक्ष करते की अघोषित संरक्षण देते?, वरिष्ठ अधिकारी या प्रकरणात निष्क्रिय का?




या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळण्यासाठी स्वतंत्र चौकशीची आवश्यकता आहे, अंबड रोडवरील केंद्र आणि त्याभोवती फिरणाऱ्या यंत्रणांवर लक्ष ठेवणं ही आता प्रशासकीय पारदर्शकतेची बाब झाली आहे. कोणी दोषी? कोणी सोयीस्कर मुकदार? - याचा उलगडा तपासाअंती होणार, पण तो होणं अत्यावश्यक आहे.

# गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक शिक्षणाचं स्वप्न साकार होणार - आ. लोणीकर

### शिक्षण परिषदेला शिक्षणाधिकाऱ्यांची दांडी, आमदारांनी व्यक्त केली नाराजी

**परतूर । प्रतिनिधी-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या धोरणामुळे शिक्षण अधिक सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थ्याभिमुख होईल, अशी अपेक्षा आहे. हे धोरण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि शारीरिक विकासावर लक्ष केंद्रित करते. शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम आणि मूल्यांकन पद्धतींमध्ये बदल करण्याची तरतूद आहे. NEP २०२० मध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला, मग तो कोणत्याही सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा असो, शिक्षणाची संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील.असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

जवाहर नवोदय विद्यालय आंबा तालुका परतुर येथे आयोजित तालुकास्तरीय शिक्षण दरम्यान आमदार लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करणे आणि डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात यावे. बहुभाषिकता आणि स्थानिक भाषांना महत्त्व दिले जाईल, तसेच भारतीय संस्कृती आणि परंपरा जतन केल्या जातील. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले जाईल. बालवाडी शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्वांसाठी शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करण्यात यावा. विविध विषयांची निवड करण्याची आणि करिअरच्या संधी निवडण्याची लवचिकता विद्यार्थ्यांना मिळेल. विद्यार्थ्यांमध्ये गंभीर विचार, समस्या सोडवण्याची क्षमता



आणि रचनात्मकता विकसित करण्यात यावा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे एक महत्त्वाचे धोरण आहे जे भारताच्या शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा देईल. या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी झाल्यास, भारत संपर्ण जगासमोर ज्ञानी आणि सक्षम राष्ट्र म्हणून उदयास येईल असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

शिक्षणाचे महत्व अनमोल आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता मिळतात, ज्यामुळे त्यांचे जीवन सुधारते. शिक्षणामुळे व्यक्ती अधिक सक्षम होऊन चांगली नोकरी मिळवू शकते, चांगले जीवन जगू शकते आणि पान २ वर

## युवा आदर्श
### शाकाहारी ...

आषाढ अमावस्येला
उगाचं म्हणतो गटारी
अभक्ष्य भक्षण करी
दारुची भरली पेटारी
दुषीत असे हवामान
हलके जेवण न्याहरी
त्यागे विशिष्ट आहार
सार्थनाव हे गतहारी
हॉटेल बार गुत्तेफुल्ल
लुटू लागती व्यापारी
भरीस पडे अंधश्रध्दा
भिती लालच अपारी
चातुर्मास पाळा नीट
बना पूर्ण शाकाहारी
वातावरण बदलते रे
नका जाऊ रे आहारी
पचन संस्थे ताण नहो
खाण्यार हा व्यवहारी
विकार उद्भवी उदरी
टाळा अन्न मांसाहारी
प्रजनन पशु पक्षांचे
नवीन जीव आकारी
जाणून घ्यावे शास्त्रा
दुर्गंध आणे ओकारी
निमीत्ताने दान धर्म
मानव धर्म स्विकारी
वध कराया चुकीचा
आपणनाही शिकारी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

रोटरी क्लब जालना इलाईट शहरात राबविणार सजग नागरिक अभियान

# सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून जालना शहरही एक दिवस इंदोरप्रमाणे नावाजले जाईल- डॉ. पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटच्या पुढाकारातून 'सिविक सेंसेस' अर्थात सजग नागरिक हे आगळे वेगळे अभियान राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून नागरिकांमध्ये नागरी शिस्त, सार्वजनिक स्वच्छतेचे भान, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सार्वजनिक पान २ वर

## पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरविणार - उमेश बजाज

सजग नागरिक अभियानबाबत रोटरी इलाईट क्लबची भूमिका विशद करताना अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, सजग नागरीक भावना अर्थात सिविक सेन्स जागृत करण्याचे काम म्हणजे डोंगराएवढे आव्हान असले तरी शासन, प्रशासन आणि सर्वांच्या सहकार्याने ते पेलण्याची आमची तयारी आहे. जालना शहरातिल नागरिकांनी काही मूलभूत शिष्टाचार पाळावेत यासाठी जनजागृतीसोबतच सर्वांना या कार्यात सहभागी करून घेण्यासाठी आम्ही अहोरात्र परिश्रम घेणार आहोत. पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून पाणी पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.




# गोरंटयाल भाजपमध्ये गेले, तर त्यांचे राजकीय अस्तित्व संपेल - नवनाथ वाघमारे

**जालना । प्रतिनिधी -** भाजपमध्ये गेल्यास माजी आमदार कैलाश गोरंटयाल यांचं राजकीय अस्तित्वच संपेल. दलित, ओबीसी आणि मुस्लिम मतदार त्यांच्या पाठीशी उभे राहणार नाहीत. काँग्रेसमध्ये ते मालक आहेत, भाजपात गेले तर गुलाम होतील, अशा तीव्र शब्दांत ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी गोरंटयाल यांच्या संभाव्य भाजप प्रवेशावर टीका केली आहे. शनिवार (दि. २६ जुलै) रोजी दुपारी एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत श्री वाघमारे यांनी राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर आपली परखड मते व्यक्त केली.



**धनंजय मुंडेंना मंत्रिपद द्या**

रमी खेळणाऱ्या मंत्र्यापेक्षा धनंजय मुंडे हे अभ्यासू, आक्रमक आणि कार्यक्षम आहेत. त्यांना मंत्रिपद द्या की नका देऊ, पण कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना हटवायलाच हवं, अशी ठाम मागणीही वाघमारे यांनी केली.

**'विनाशकाले विपरीत बुद्धी'**

वाघमारे म्हणाले, गोरंटयाल हे भाजपात पान २ वर

# संपादकीय

## शिक्षण्याचा पाया - मातृभाषा

शिक्षणाची भाषा कोणती सांगणे चालू आहे अनेक वर्ष विचार करणे सुरू आहे. समाजाचीच तर घराघरात चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वादविवाद म्हणा कारण आईवडील, टीका, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये मतभिन्नता दिसून येते. शिक्षणासाठी कोणते माध्यम सांगावे तर्कशास्त्र वापरून जातमध्य वर्गीय आणि निम्नम वर्गीय विवाद उडतो. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या जशा बदलू तूळ हा गोंधळ जास्त. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून एक माणूस आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या तोंडी बोलू. पूर्वी शहरी भागापूरते हे लोण आता ग्रामीण भागापूरते आहे. ग्रामीण तसेच शहरी गरीब, कष्टकरी पालक कर्ज स्वीकारून उसनवारी करून लाखो उकलून देवून आपल्या बोलण्यातून मराठी माध्यमांचे प्रश्न आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम म्हणून शिक्षण निवडणे पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षण इंग्रजीतून वापरणे योग्य आहे का? हे विचार पालक करत नाहीत. मातृभाषे शिक्षण पाहिलही चांगले इंग्रजी शिकता हीच पालक विसरत चालली आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिक्षणाची नैसर्गिक रचना आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा तो आईच्या पोटात असल्याने एकाला उघड. मातृभाषेचे शिक्षण पालकाने मुलाची मानसिक वातावरणातून परिपूर्ण होती कारण ते मूळचे भाग आहे ते वातावरण प्रतिबिंबित करते त्याला मातृभाषेत संपूर्ण मातृभाषेतून शिक्षण हीच शिक्षणाची आदर्श स्थिती आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतून होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृ क्षमता अनन्यसाधारण महत्त्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण देते, मातृ आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्कार शिदोरीच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून प्राथमिक प्रशिक्षण आणि माध्यमिक स्तर असले तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असले पाहिजे, असे अनेक भाषा, समाज, पक्ष मानस, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रीय कार्य राष्ट्रीय व जागतिक विज्ञान संस्था ओरडून सांगत आहेत. एका मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणानंतर इंग्रजी किंवा इतर परिकीय भाषा आत्मसात करणे, त्यांचा परिस्थितीनुसार वापर करणे यास कारणीभूत असणे आवश्यक नाही. जर शिक्षण प्रणाली बाहेर पडली असेल तर त्याला आरामदायी प्रदेशातून बाहेर पडण्याची व्यवस्था असेल, राष्ट्रप्रेम आणि त्याला राष्ट्रीय सभागृह भेडसावणार असेल तर त्याला देशाला सार्वभौम समस्या व आव्हाने ओळखण्यास सक्षम असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्र काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधकातून माभाषेतून शिक्षण घेतलेल्या उपायांची कल्पना व गुणवत्ता ही माभाषेतरच शिक्षण घेतलेल्या दर्जापेक्षा कितीतरी सु व सरस असते असे दिसून आले आहे. महात्मा गांधी मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम म्हणतात. मातृभाषेतून आनंदाचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतून होऊ शकते. जेष्ठ डॉक्टर अनिल काकोडकर म्हणतात,मातृभाषाच सत्य शिक्षण माध्यम आणि त्याचा विकास त्यातून त्यांचा सर्वांगीण होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही भाषा आहे. इंग्रजीवर घडवून आणलेल्या सर्वच ठिकाणी पालकांना असे वाटते की पालकांना पालक म्हणून इंग्रजी माध्यमंचे म्हणणे मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या माध्यमातून शिकलेले सर्वच साध्य करू शकत नाहीत. उलट आज जे पदावर अभ्यासलेले ते मान्य करतात डॉक्टर, इंजिनियर, उच्च वकील आहेत मग शिक्षक, शिक्षक, राजकीय असोत की राजकीय, उद्योजक, अभिनेते सर्व मराठी समाजातून शिकत आहेत. आयएएस आयपीएस, आयएफएस जर यादी पाहिली तर ५ टक्के मार्गाचे शिक्षण मातृभाषेचे आहे. राष्ट्रीय काही वर्षात गुणतब्बत उमेदवारांनी सर्वाधिक भाषेतून शिक्षण घेण्याची संख्या मोजावी. राज्य, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, चीन, जपान, पॅनेल या प्रगत देशात मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. या पालके प्रामाणिकपणे आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेतात. फिनलँड कॉलिन देशाच्या ज्या देशाच्या शिक्षणाचे अनुकरण प्रगत राष्ट्र करतात त्या देशात मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. मराठी भाषा बोलणे तर सोडाच, इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठीचा समृद्धी लुप्त होईल. आनंदात, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, उत्सवाचे रोपण मातृभाषाची कामी. शिक्षण मातृभाषे मूळ व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मान आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून हेच खरे शिक्षण आहे.मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मान आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून हेच खरे शिक्षण आहे.मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मान आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून हेच खरे शिक्षण आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पर्यटनाला चालना मिळावी या उद्देशाने त्रिशताब्दी जेष्ठ नागरिक मंडळाची सहल यशस्वी



जेष्ठ नागरिकांमध्ये नेहमीच उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे व युवकांनी निसर्गाचा आणि पर्यावरणाचा फायदा घ्यावा या उद्देशाने त्रिशताब्दी जेष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने चिखलदरा येथे सहल काढण्यात आली होती.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे राज्यातील महत्वपूर्ण पर्यटक स्थळांना युवा वर्ग, जेष्ठ नागरिक, शाळकरी मुले, विद्यार्थी व राज्यातील जनतेनी भेट द्यावी व राज्यातील कानाकोपऱ्यातील इतिहास जाणून घ्यावा. याच उद्देशाने जेष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने ही सहल काढण्यात आली आणि मुख्यत्वेकरून संपूर्ण जेष्ठ नागरिकांनी सहलीचा भरपूर आनंद सुध्दा घेतला. यात ऐतिहासिक जैन मंदिर मुक्तागिरी व चिखलदरा येथील निसर्गरम्य परिसर यामुळे संपूर्ण जेष्ठ नागरिक मंत्रमुग्ध झाले.त्याचप्रमाणे पर्यावरणाला वाचविण्याचा संदेश सर्वांपर्यंत पोहचावा या उद्देशाने मुक्तागिरी व चिखलदरा येथे एक-एक वृक्ष लावुन जेष्ठ नागरिकांनी आजच्या युवकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्याचा संदेश दिला. त्यामुळे या सहलीमध्ये पर्यटक, पर्यटन व पर्यावरण याबद्दल संदेश देण्याचे काम त्रिशताब्दी जेष्ठ नागरिक मंडळ नागपूरच्या वतीने करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने विजय वाघ, प्रमोद चौहान, संजय उकंडे, संजय तळमले, विलास काटोले, ओमप्रकाश टुले, हरिश्चंद्र बल्की, रमेश लांजेवार, देवराव शेंडे, हरगोविंद भांडारकर, निलेश गुजर, बाबा व्यापारी, विजय कुकडे, सतीश चरडे,चंद्रकांत कोडापे,रवींद्र ढोमणे, राम कृष्ण ठाकरे, मनोहर ठाकरे, बाबाराव तायवाडे, विनोद ठाकरे, बाबा मोहिते, रामूजी सिंगनजुडे, विष्णू तळमले, एकनाथ चवरे, हरिभाऊ डहाके, मुकुंद मेहता, सुरेश वनवे, विजय कळमकर, आनंदराव खापरे, मुरलीधर जुमडे, श्रीकांत गहुकार, महल्ले जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# सणांचा व्रत वैकल्याचा महिश्रवण

काल म्हणजे शुक्रवारपासून श्रावण महिना सुरू झाला. हिंदू धर्मात श्रावण महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. श्रावण महिन्यातील सोमवार हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या दिवशी महादेवाची पूजा केली जाते. तसे श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा व व्रत करण्याची हिंदू व जैन धर्माची परंपरा आहे. श्रावण महिन्याला सणांचा महिना म्हंटले जाते. कारण श्रावण महिन्यातच सर्वात जास्त सण येतात. या महिन्यात व्रत वैकल्याची रेलचेल असते. श्रावण महिन्यात नाग पंचमी, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, बैल पोळा हे सण येतात. त्यानंतर येणारे गौरी गणपतीही याच महिन्यात खुणावत असतात. नाग पंचमी पासून दसरा दिवाळी पर्यंत सगळ्या हव्या हव्याशा सणांची सुरुवात याच महिन्यापासून होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत घराघरात असतो. श्रावणातील प्रत्येक दिवस सण होऊन जातो. अशा आनंदी वातावणामुळे असेल कदाचित पण श्रावणात मनाच्या सांदी कोपऱ्यात उत्साहाचे नवे ऋतू फुलत असतात. बहुतेक सगळ्या सणामध्ये आणि अंगिकारल्या जाणाऱ्या व्रत वैकल्यांमधून संकटातून निर्भिडपणे आणि यशस्वीपणे बाहेर येण्यासाठी शक्ती मिळवण्यासाठी प्रेरणा मिळते. संसारातील सर्व सुख दुःखाचा सारीपाट मांडला असताना मन मोकळं करून सख्याना समजून घेण्याचे हक्काचे क्षण हा महिना देऊन जातो. श्रावण महिना केवळ हिंदुसाठीच नव्हे तर मुस्लिम आणि पारशी बांधवांसाठी ही पवित्र महिना मानला जातो कारण याच महिन्यात मुस्लिमांची बकरी ईद आणि पारशी बांधवांची पतेती हे सण येतात. त्यामुळे हिंदू प्रमाणेच जैन, मुस्लिम आणि पारशी बांधव श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मुस्लिम आणि पारशी बांधव देखील त्यांचे सण उत्साहात आणि जल्लोषात साजरे करतात. श्रावण महिन्यात निसर्गाला उधाण आलेले असते. आषाढ महिन्यात झालेला पावसाने सर्वत्र हिरवळ दाटलेली असते. निसर्ग आषाढ सरी पिऊन हिरवे गालिचे पसरून बहरलेला असतो. हा

हिरवा गालिचा पाहूनच
हिरवे हिरवेगार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीवर....

ही कविता बालकवींना सुचली असावी. श्रावण महिन्यात सगळीकडे वसुंधरेवर श्रावणाच्या धारा बरसत असतात. श्रावणाच्या धारा बरसत असल्याने निसर्ग सौंदर्य तृप्तीचा हुंकार देत असतो. निसर्गाचे बहरलेले सौंदर्य पाहताच हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला या ओळी ओठी गुणगुणावश्या वाटतात. श्रावण म्हणजे चैतन्य.....

श्रावण म्हणजे उत्साह.....
श्रावण मासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरून उन पडे

या कवितेत बालकवींनी श्रावण महिन्याचे चित्रण यथार्थपणे मांडले आहे.

**श्याम ठाणेदार**

# जालन्यात पावसाचा जोर वाढला

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात गेले काही दिवस हलक्या सरींचा अनुभव होत असतानाच आज पावसाने अचानक जोर धरला आहे. शहरात सकाळपासून सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक भागात रस्ते जलमय झाले असून, ठिकठिकाणी पाणी साचल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः शहरातील मुख्य रस्ते, जुने मोंढा, आनंद नगर, स्टेशन रोड, जिजामाता कॉलनी आदी ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली आहे.

## वाचकांचे मनोगत

# उद्धव बाळासाहेब ठाकरे सामर्थ्यवान नेते

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे लोकशाहीर २७ जुलै रोजी जन्मदिवस, उद्धवजी उत्तम दर्जाचे चित्रकार चित्र प्रतिबिंब कसाब.ठाकरे घराण्याला सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिकतेचे आधिष्ठान. आजबा, चा वारसा हाहु निकलालेत. शिवसेना ज विचारांची निवड.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसाचे जीवपाड प्रेम. कारण त्यांनी लाखो मराठी तरुणांना विकसित केले. उद्धवजी.आलीटने पदाधिकाऱ्यांना समान पक्ष बांधणी मजबूत केली.आपल्या नेतृत्वाची झलक त्यांनी वरवर मुंबई भगवा फडकवून शोधून काढली.संघाची मांडत, लोकपक्षाचे आमदार, कुशल निवडून आणले. सर्वपक्षीय विरोधी गटात समाविष्ट आहेत. पंचवीस वर्षे भाजपात असलेले तुटले आहेत.अशा संबंध स्वतःच्या पक्षाचा बचाव करत आहेत. उद्धव ठाकरे यांना संघर्ष करत आहेत. राष्ट्रवादी पक्ष मित्राचा हात जोडून नवे समीकरण जमवले.तिघांचे सरकारचे मुख्यमंत्री उद्धवजी मुख्यमंत्री.कोणताही राज्य कारभाराचा अनुभव नसताना उत्तम मुख्यमंत्री म्हणून त्यांचे नावलौकिक आहे.याच परिणाम कोरोनाचा प्रादुर्भाव पाचला होता. आले. त्याच्या दरम्यान त्यांना लढा दिला.याचा सामना उठवत २०२१ मध्ये लाभत उभी फुटली.४० सदस्य, १३ लोकसभा सदस्य बाहेरून बाहेर.शिवसेना प्रमुखांचे उत्तरले संकट आले.त्यास धैर्याने तोंड देत असताना पक्षाचे नाव चिन्ह व चिन्ह गेल्या.अशा राष्ट्राने आपल्यावर विश्वास ठेवला आहे, शिवसैनिकांना धीर देत वाक्ये लिहित आहेत.निवडणूक आयोगाचे नवीन गटाचे नाव व चिन्हे चिन्हे मैदान उतरले. अंधेरीतील कुल पोटीतिच विजय दोन.श्रीमती ऋतुजा रमेश लटके मशालवर निवडून पहा. पक्षावर आलेले संकट त्यांना शिवसैनिकांनी वाचवले हे विशेष. संस्थाही अगतिक घडत आहेत याची काळजी घेतली चालत आहे. कितीही टिका टिपणे तरी आपला तोल ढासळू शकत नाही. मुस्लिम धर्मही उद्धवजींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे हे उमेश त्यांचे सामर्थ्य आहे. अश्याप्रकारे विजयाचा दिवस लोक आनंदात करतात हे विशेष आहे. आहे.अशा सामर्थ्यवान मानाचा सलाम.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

पान १ वरुन

## गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक ...

समाजाच्या विकासात योगदान देऊ शकते.

शिक्षणामुळे व्यक्तीला विविध विषयांचे ज्ञान मिळते आणि वाचन, लेखन, गणित, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी विविध कौशल्ये शिकायला मिळतात. शिक्षणामुळे व्यक्तीला चांगली नोकरी मिळवण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारते. शिक्षणामुळे व्यक्ती सामाजिकदृष्ट्या अधिक जागरूक होते आणि समाजाच्या विकासात योगदान देऊ शकते. असेही लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले. पुढे बोलताना आ.लोणीकर म्हणाले की, शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ती स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवू लागते. शिक्षणामुळे व्यक्तीला समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते. शिक्षणामुळे व्यक्तीचे मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकास होतो. शिक्षणामुळे व्यक्ती जगाकडे अधिक चांगल्या प्रकारे पाहू शकते आणि नवीन गोष्टी शिकायला उत्सुक असते. शिक्षणाचे महत्त्व आजही वाढत आहे. शिक्षणाने तंत्रज्ञानाचा विकास साधला आहे, ज्यामुळे नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. जागतिकीकरणामुळे शिक्षण अधिक महत्वाचे झाले आहे, कारण लोकांना जगाच्या कानाकोपऱ्यात काय चालले आहे, याची माहिती असणे आवश्यक आहे. समाजात वेगाने बदल होत असल्यामुळे, शिक्षणामुळे व्यक्तीला या बदलांना सामोरे जाण्यासाठी तयार राहता येते. शिक्षण हे प्रत्येकासाठी आवश्यक आहे. शिक्षणाने व्यक्ती आणि समाज दोन्ही प्रगती करू शकतात असेही लोणीकरणी यावेळी स्पष्ट केले.

या शिक्षण परिषदेच्या माध्यमातून नक्कीच मुलांचे उज्वल भविष्य घडणार असून त्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे आधुनिक शिक्षणासाठी सर्व शिक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. शालेय शिक्षणाबरोबरच सार्वजनिक स्वच्छता शिस्त या बाबी देखील विद्यार्थ्यांना शिकवणे आवश्यक आहे मुलींसाठी स्वतंत्र शौचालय शालेय परिसरात वृक्षारोपण पालक संघाच्या वारंवार बैठका शिक्षण समितीच्या बैठका यासह मख्याध्यापक केंद्रप्रमुख गटशिक्षण अधिकारी यांनी वेळोवेळी पालक मेळाव्यांच्या माध्यमातून जनजागृती करणे व तालुक्यातील प्रत्येक शाळा आदर्श स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाच्या माध्यमातून शाळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी बक्षीस देखील देण्यात येते असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

गावातील लोकप्रतिनिधी आणि पुढाऱ्यांनी शाळेचे पालकत्व घेणे गरजेचे असून उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार सन्मान करणे आवश्यक आहे प्रत्येक शाळेमध्ये गुणवान आणि नामांकित विद्यार्थी घडवण्यासाठी पालकांसह शिक्षकांनी मेहनत घेणे आवश्यक आहे त्यासाठी आधुनिक शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक अधिक वापर करून गोरगरिबांची मुलं मुली मोठ्या पदावर कशा जातील यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे पाया पक्का असेल तरच विद्यार्थी यशस्वी होतील त्यामुळे शिक्षकांनी शर्तीचे प्रयत्न करून विद्यार्थी घडवण्याचं काम करणे आवश्यक असल्याचे देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

नवीन शैक्षणिक धोरण २०20 नुसार केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून तालुक्यातील सर्व शाळांना अत्याधुनिक बनवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत प्रत्येक शाळेमधून डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्यासारखे शास्त्रज्ञ व अधिकाधिक बुद्धिमान विद्यार्थी निर्माण व्हावेत यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे आयुष्यात लोक पैसा कमावण्याच्या मागे लागतात परंतु पैसा संपतो परंतु बालपणापासून घेतलेले शिक्षण मात्र आजीवन प्रत्येकाच्या सोबत राहते त्यामुळे परतूर तालुक्यातील शिक्षणाचा आवाज बुलंद व्हावा लोकप्रतिनिधी म्हणून माझी अपेक्षा आहे माझी आवश्यक ती सर्व मदत करायला मी तयार आहे यासह पालक शिक्षक व शिक्षण प्रेमी या सर्वांनी प्रचंड मेहनत करणे आवश्यक आहे तालुक्याचे नाव उंचावण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात जे काही करावे लागेल त्या प्रत्येक बाबीसाठी मी कायम तत्पर असेल असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**परतूर येथे तालुकास्तरीय शिक्षण परिषदेला शिक्षणाधिकाऱ्यांची दांडी; आमदार लोणीकरांनी व्यक्त केली जाहीर नाराजी**

जालना जिल्हा परिषदेच्या नवनियुक्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती संगीता भागवत या परतूर तालुकास्तरीय शिक्षण परिषदेला गैरहजर असल्याबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणातून जाहीर नाराजी व्यक्त केली. परतुर तालुक्यातील सर्व शिक्षक एकत्रित आलेल्या असताना शिक्षण परिषदेसारख्या महत्त्वपूर्ण विषयावर शिक्षणाधिकाऱ्यांनाच गांभीर्य नसेल तर ही अत्यंत खेदाची बाब आहे त्या संदर्भात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे विचारणा केली जाईल अशा शब्दात आमदार लोणीकरांनी आपली नाराजी व्यक्त केली.

प्रसंगी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम अंतर्गत प्राथमिक शाळा रायगव्हाण प्रशाला परतुर प्राथमिक शाळा दैठणा बु आनंद विद्यालय संत तुकाराम गुरुकुल लिखित पिंपरी, समर्थ विद्यालय पाटोदा प्राथमिक शाळा कोकाटे हादगाव प्राथमिक शाळा भोंगाने दहिफळ यासह उत्कृष्ट काम करणारे शिक्षक यांचा देखील यथोचित सत्कार आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे सरपंच मेराज खतीब, माजी सरपंच प्रशांत बोनगे बंडू मानवतकर सावता काळे, ड.सुरेश काळे गटविकास अधिकारी श्री राजेश तांदळे गटशिक्षणाधिकारी श्री अशोक सोळंके नवोदय विद्यालय आंबा प्राचार्य श्री मस्के, प्रदीप शर्मा श्री आंधळे सर श्री तांदळे सर केंद्रप्रमुख मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामाजिक संस्थांच्या ...

ठिकाणी योग्य वर्तन याविषयी जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. या अभियानाच्या फलकाचे इमोशन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याहस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवार दि. २५ जुलै रोजी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक संस्थांची बैठक पार पडली. यावेळी रोटरी इलाईटने सदरील संकल्पना विशद केली. त्यानंतर या अभियानाच्या फलकाचे विमोचन डॉ. पांचाळ यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे, क्लबचे अध्यक्ष उमेश बजाज, सचिव शरद गादीया, डॉ. प्रल्हाद उढाण, गिरधर लधानी, विनोद देशमुख यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. पांचाळ म्हणाले पुढे की, सामाजिक संस्थानी पुढाकार घेतला तर जालना शहरही एक दिवस इंदोरप्रमाणे नावाजले जाईल. प्रशासन पूर्णपणे मदतीसाठी तयार आहे. सामाजिक संस्थानी पुढ येवून मदत व मार्गदर्शनही करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, सजग नागरिक अभियानाच्या जनजागृतीसाठी रस्त्यालगत सुचना फलक, डीजीटल प्रचार व्हॅन, पथनाट्य, शाळा, महाविद्यालयात कार्यशाळा, विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, ओरडून किंवा मोठमोठ्याने बोलणे टाळावे, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, ओळखीच्या व्यक्तींना नमस्कार किंवा अभिवादन करावे, आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा, वाहतूक नियमांचे पालन करावे, इतरांचा आदर करावा, सर्वांशी चांगले वागावे, कोणाचाही अपमान किंवा अनादर करू नये, आपल्या वस्तूंची काळजी घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत मदत करावी, आजूबाजूच्या परिसरात झाडे लावावी यासाठी जनजागृती व प्रत्यक्ष कार्य केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## गोरंट्याल भाजपमध्ये ...

गेले, तर त्यांचे कट्टर विरोधक असलेल्या अर्जुन खोतकर यांचा प्रचार करावा लागेल. त्यामुळे त्यांची राजकीय निष्ठा आणि अस्तित्व दोन्ही धोक्यात येईल.

**गोरंटयाल काँग्रेसमध्ये 'मालक', भाजपात 'गुलाम'**

काँग्रेसमध्ये गोरंटयाल यांचं वर्चस्व आहे. भाजपमध्ये गेले तर त्यांना सत्तेच्या खेळात गुलामगिरी स्वीकारावी लागेल. त्यामुळे त्यांचा विनाश अटळ आहे, असा थेट इशारा वाघमारे यांनी दिला.

**ओबीसी नेत्यांना बदनाम करण्यासाठी अंजली दमानिया सुपारी घेते!**

ओबीसी नेतृत्वाला लक्ष्य करण्याच्या प्रयत्नांबाबत बोलताना वाघमारे म्हणाले, अंजली दमानिया ही ओबीसी नेत्यांना मलिन करण्यासाठी सुपारी घेते. धनंजय मुंडे यांच्यावरून केलेले आरोपही त्याच षडयंत्राचा भाग आहेत.

या वक्तव्यातून ओबीसी मतदारांचे प्रबळ नेतृत्व आणि त्यांच्या राजकीय अस्तित्वाबाबत वाघमारे यांची अस्वस्थता आणि आक्रमकता स्पष्ट होते. त्यांच्या टीकेचा रोख केवळ भाजपवर नाही, तर पक्षांतर करणाऱ्या नेत्यांवरही आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस व पंकजा मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त जालना भाजपाकडून रक्तदान शिबीर; ३४८ दात्यांनी केले रक्तदान

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस व जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा.ना. श्रीमती पंकजाताई मुंढे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपा नेते श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वाखाली भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून जालना महानगर जिल्ह्यामध्ये एकूण ३४८ जणांनी रक्तदान करून सामाजिक भान जपून रकतदानाचा विक्रम केला.

यामध्ये जुना जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. महेश निकम यांच्या मंडळात सर्वाधिक १२१ रक्तदान झाले, तसेच जालना ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष श्री. संजय डोंगरे यांच्या मंडळात १११, पूर्व जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोल धानुरे यांच्या मंडळात ६१, नविन जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. सुनील खरे यांच्या मंडळात ५५ रक्तदान झाले. असे एकूण जालना महानगर जिल्ह्यामध्ये एकुन ३४८ रक्त दात्यांनी रक्तदान केले.



हे शिबीर यशस्वी करण्यासाठी राजेश राऊत, बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर भांदरगे, विमलताई आगलावे, विजय कामड, सतीष जाधव, सोपान पेंढारकर, धनराज काबलीये, भागवत बावणे, कपिल दहेकर, अर्जुन गेही, अनिल सरकटे, संध्याताई देठे, सुभांगीताई देशपांडे, सखुबाई पणबिसरे, सिद्धिविनायक मुळे, राजेंद्र भोसले, शशिकांत घुगे, सुभाष मामा पवार, राजू गवई, सोमेश काबलीये, सय्यद इम्रान, वसंत शिंदे, सुनील पवार, शिवराज जाधव, रवींद्र अग्रवाल, सुमीत सुरडकर, सुहास मुंढे, शिवराज नारीयलवाले, शाम ऊगले, सिद्धेश्वर हाजबे, सोमेस काबलिये, मनोज बिडकर, जुनेद मिर्झा, माणिक फड, विष्णु दादा भूतेकर, बबनराव सिरसाठ, काकासाहेब घुले, पुंजाराम भूतेकर, कैलास उबाळे, मुकेश चव्हाण, संजय जाधव, राजाराम (राजे) जाधव, सतीश केरकळ, नागेश अंभोरे, गजानन खरात, बद्रीनाथ भसांडे, दौलत भुतेकर, महेश मुळे, विष्णु डोंगरे, दत्ता जाधव, ज्ञानेश्वर राठोड, विजय मोहिते, अनिल यशवंते, तुकाराम कळकुंबे, नारायण मोहिते, संतोष खंडेलवाल, कृष्णा गायके, गोपाल चौधरी, प्रदीप देठे, जगदीश यंगूपटला, सुदर्शन काळे, अजय कोल्हे, गौरव गोधेकर, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, देविदास देशमुख, गुलाब पणबिसरे, सिद्धार्थ संचेती आदींची उपस्थिती होती.

भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस रक्तदानाच्या माध्यमातून साजरा केला जात आहे, हे निश्चितच प्रेरणादायी आहे. रक्तदान ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. आपल्या थोड्याशा योगदानातून एखाद्याचे संपूर्ण आयुष्य वाचू शकते असे त्यांनी सांगितले व सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल व रक्दात्यांचे आभार मानले.

शिबिरात संकलित झालेले रक्त जनकल्याण रक्तपेढी, जालना यांच्या सहकार्याने संकलित करण्यात आले.

# भाजपाचा खरा चेहरा जनतेसमोर उघड - तय्यबबापू देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाने २०१४ मध्ये जनतेला खोट्या आश्वासनांनी फसवले. आता मात्र भाजपाचा खरा चेहरा उघड झाला असून, जनता पुन्हा सेक्युलर विचारांच्या पक्षांनाच सत्तेवर आणणार आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी केला.

ते जालना येथे माध्यमांशी बोलत होते. त्यांनी भाजपावर अनेक गंभीर आरोप करत, सत्ताधाऱ्यांची फसवणूक, आयात नेते, आणि ईडी-सीबीआयचा गैरवापर या मुद्द्यांवर टीका केली.

देशमुख म्हणाले, २०१४ साली भाजपाने 'प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये' जमा करण्याचे आश्वासन दिले. हे आश्वासन पूर्ण न होता केवळ जनतेला भूलथापा देऊन सत्ता हस्तगत करण्यात आली. भाजपाजवळ निवडणुकीसाठी स्वतःचे उमेदवारही नव्हते. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या आमदारांना ईडी, सीबीआयचा धाक आणि पैशाच्या जोरावर पक्षात प्रवेश देण्यात आला. भाजपाची 'वॉशिंग मशीन' ही भ्रष्ट नेत्यांना पवित्र करण्याचे काम करत आहे, अशी उपरोधिक टीका देशमुखांनी केली.



देशमुख म्हणाले, आज भाजपाचे बहुतांश खासदार व आमदार हे इतर पक्षांतून आलेले आहेत. मूळ कार्यकर्ते मात्र दुय्यम स्थानावर आहेत. भाजपाच्या मूळ कार्यकर्त्यांची दुर्दशा सुरू आहे.

स्वार्थासाठी पक्ष बदलणाऱ्या नेत्यांना पुन्हा पक्षात घेऊ नये. यामुळे निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय होतो आणि लोकशाहीचे नुकसान होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीचा विजय जालना जिल्ह्याची जनता आता सोनिया गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहे. जनतेने आता गद्दारांना आणि धोकेबाजांना त्यांची जागा दाखवायची तयारी केली आहे, असा विश्वासही देशमुख यांनी व्यक्त केला.

भाजपाची वॉशिंग मशीन ही काही दिवसांचीच आहे. २०२९ च्या निवडणुकीत भाजप सत्तेबाहेर जाईल. जे सत्तेसाठी गेले, तेच पुढे परत येतील, हाच राजकीय शोकांतक आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# जालन्यात अनैतिक संबंधाच्या संशयातून एकाचा खून

## मंठा व परतूर पोलिसांची संयुक्त कारवाई

**जालना । प्रतिनिधी** - अनैतिक संबंधाच्या संशयावरून एका व्यक्तीचा लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करून खून केल्याची धक्कादायक घटना जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यात उघडकीस आली आहे. ही घटना केंधळी शिवारातील विश्वलक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज या सिमेंट गट्टू बनवणाऱ्या कारखान्याजवळ घडली.

या प्रकरणाचा परतूर आणि मंठा पोलिसांनी संयुक्त तपास करून अवघ्या काही तासांत उकल केली असून, दोघा संशयित आरोपींना अटक केली आहे.

खून झालेल्या व्यक्तीचे नाव - श्रीपाद स्वामी (वय ५५) असे आहे. मयत श्रीपाद स्वामी हे केंधळी शिवारात एकटे राहात होते. त्यांच्यावर निवृत्ती सवडे (रा. नांदखेडा, ता. जाफराबाद) आणि त्यांच्या मेहुण्याने संशयाच्या भोवर्यातून आक्रमक पवित्रा घेत, त्यांच्या राहत्या परिसरातच जबर मारहाण केली.

स्वामी यांना लाठ्या-काठ्यांनी अमानुषपणे मारहाण करण्यात आली. गंभीर अवस्थेत त्यांना जालना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

घटनेनंतर दोन्ही आरोपींनी स्वतःच मृत व्यक्तीस रुग्णालयात दाखल केले, मात्र त्यानंतर गुपचूप निघून जाण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी यावर तत्काळ कारवाई करत त्यांना ताब्यात घेतलं. परतूर व मंठा पोलिसांनी संयुक्तपणे केलेल्या तपासातून उघड झालं की, अनैतिक संबंधाचा संशय हीच हत्या करण्यामागील प्रमुख कारणीभूत बाब होती.

या घटनेमुळे केंधळी शिवार व परिसरात भय व अस्वस्थतेचं वातावरण निर्माण झालं असून, नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

## प्रोफेसर्स फोरमच्या मागणीला यश!

# कॅन्सर तपासणीसाठी मोफत मोबाईल व्हॅन

**परतूर । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी मोफत कॅन्सर तपासणी सेवा आता त्यांच्या दारातच पोहोचणार आहे. प्रोफेसर्स फोरमचे प्रवर्तक प्रा. सिद्धार्थ पानवले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी मोबाईल कॅन्सर तपासणी व्हॅन उपलब्ध करून दिली आहे.

या व्हॅनद्वारे वाटूर, परतूर आणि श्रीष्टी येथे विशेष कॅन्सर तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ही मोफत सेवा सामान्य नागरिकांसाठी लाभदायक ठरणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिर २८ जुलै २०२५ - परतूर, शासकीय आरोग्य केंद्र येथे तर २९ जुलै २०२५ - श्रीष्टी, शासकीय आरोग्य केंद्र होणार आहे.

प्रोफेसर्स फोरमचे सदस्य प्रा. किरण मगर आणि प्रा. कुशल मगर यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, विशेषतः महिला आणि पुरुषांनी या शिबिरात सहभागी व्हावे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणारी ही तपासणी आपल्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

**कर्करोग वेळीच ओळखल्यास बरा होतो - प्रा. सिद्धार्थ पानवले**

प्रा. सिद्धार्थ पानवले म्हणाले, कर्करोग हा वेळीच निदान आणि योग्य उपचाराने बरा होऊ शकतो. लक्षणे दिसताच त्वरित तपासणी व उपचार घेणे गरजेचे आहे. मोबाईल व्हॅनद्वारे ग्रामीण भागातील नागरिकांना या महत्त्वाच्या तपासणीची संधी मिळणार आहे, हे निश्चितच समाधानकारक आहे.

या शिबिरात तपासणी पूर्णतः मोफत असून, नागरिकांनी कोणतीही संकोच न करता या तपासणीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रोफेसर्स फोरम तर्फे करण्यात आले आहे.

या शिबिरामागील हेतू म्हणजे कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे वेळीच निदान करून मृत्युदर कमी करणे, आणि ग्रामीण जनतेला सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.

# महिला सुरक्षा व न्यायासाठी महिला काँग्रेसचा मूक मोर्चा

## गांधी चमनवर निषेधाची शांत आंदोलनात्मक भूमिका

**जालना । प्रतिनिधी -** देशभरात महिलांवर वाढणारे अत्याचार, न्याय मिळण्यात येणारा विलंब आणि केंद्र सरकारची निष्क्रिय भूमिका याच्या निषेधार्थ जालना जिल्हा महिला काँग्रेसतर्फे गांधी चमनवर शनिवारी मूक मोर्चा काढण्यात आला.

महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, केंद्र सरकार या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करत आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकार मौन बाळगत आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अल्का लांबा यांच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार राज्यभर विविध ठिकाणी महिला काँग्रेसतर्फे आंदोलने करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जालना शहरात गांधी चमनवर हा मूक मोर्चा काढण्यात आला.

**मूकतेतून संतप्त संदेश**

या मूक मोर्चाद्वारे महिलांनी आमच्यावर होणाऱ्या अन्यायाचा आवाज ऐका असा संदेश सरकारला दिला. कोणताही गोंधळ किंवा घोषणाबाजी न करता शांततेत व्यक्त केलेला निषेध हे आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले. या मूक आंदोलनात जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार यांच्यासह लतीफा शेख, सविता गायकवाड, जया आठवले, सावित्रीबाई इंगळे, मनीषा चांदोडे, प्रतिक्षा खाडे, कोमल कामतीकर आणि इतर महिला काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.




**न्यायासाठी लढा सुरूच राहणार : नंदाताई पवार**

महिलांवर अत्याचार रोखण्याची जबाबदारी सरकारची आहे. मात्र सत्ताधारी मंडळी केवळ निवडणुकीपुरते महिला हिताचे घोषणाबाजीत अडकून राहतात. आमचा लढा केवळ राजकारणासाठी नव्हे, तर प्रत्येक अत्याचारग्रस्त महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी आहे, असे महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार यांनी स्पष्ट केले.

# जावयाने केली सासूची फसवणूक!

**जालना । प्रतिनिधी -** पानशेंद्रा गावातील एका धक्कादायक प्रकरणात सासूच्या बँक खात्यातील तब्बल ५७ लाख रुपये लंपास केल्याप्रकरणी जावयाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २०१८ पासून ते आजपर्यंतच्या कालावधीत सुरू होता. या प्रकरणी कांताबाई भिकाजी पाचरणे (रा. पानशेंद्रा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून अशोक साहेबराव सुलताने या जावयाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार कांताबाई यांच्या बँक खात्यातील ५७ लाख रुपयांची रक्कम अशोक सुलताने यांनी वेळोवेळी काढून घेतल्याचे उघड झाले आहे. ही रक्कम कुठल्याही परवानगीशिवाय व संमतीशिवाय वळवण्यात आली. हा प्रकार गेल्या ७ वर्षांपासून सुरू होता. नुकतेच खात्यातील व्यवहारांची माहिती मिळाल्यानंतर कांताबाई यांनी पोलिसांकडे तक्रार केली. या तक्रारीवरून पोलिसांनी त्वरित कारवाई करत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सदर बाजार पोलीस स्टेशनचे कर्मचारी करत आहेत. या फसवणुकीच्या प्रकारामुळे पानशेंद्रा गावासह जालना शहरात एकच खळबळ उडाली आहे.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी अच्युत मोरे यांची निवड



**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील पत्रकार अच्युत मोरे यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. नांदेड येथील विभागीय बैठकीत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत आणि राज्य सरचिटणीस सुजाता खानोरे यांच्या स्वाक्षरीचे नियुक्ती पत्र देऊन मोरे यांच्यावर जालना जिल्ह्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथे बोलविण्यात आलेल्या विभागीय बैठकीत पत्रकारांच्या विविध समस्यावर चर्चा करण्यात आली. दरम्यान जालना येथील पत्रकारांसाठी घरकुल योजना राबविण्याचा मनोदय प्रदेशाध्यक्ष मनीष केत यांनी बोलून दाखविला. आगामी काळात पत्रकार संघाची ध्येयधोरणे राबवणे, दरवर्षी नवीन सभासद नोंदणी करणे, शहर, जिल्हा कार्यकारणीचे पदाधिकारी नियुक्त करणे, जिल्हातील सर्व तालुका अध्यक्ष नेमणूक करून कार्यकारणी तयार करणे यासह पत्रकार संघाची कामे प्राधान्याने करावीत. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कायम अग्रेसर राहिला आहे. त्यासाठी जालना जिल्ह्यातील पत्रकार आणि पत्रकारितेतर कर्मचार्यांच्या समस्या, विविध मागण्या यासाठी काम करावे असे नियुक्तीपत्रात म्हटले आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, रुपेश पाडमुख, नांदेड जिल्हाध्यक्ष श्रीधरराव नागापुरकर, परभणी रमेश नाटकर, हिंगोली जिल्हाध्यक्ष आय. डी. पठाण, जालना जिल्हाध्यक्ष अच्युत मोरे यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थिती होती.



# लॉयन्सतर्फे ब्रिजमोहन लड्ढा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ नि:शुल्क स्वर्गरथ सेवा

**जालना । प्रतिनिधी -** सेवा ही धर्म आहे या तत्त्वाला अंगीकारत लायन्स क्लब ऑफ जालनाने समाजसेवी स्व. ब्रिजमोहन लड्ढा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ वर्षभरापूर्वी सुरू सुरू केलेला 'लायन स्वर्गरथ' सेवा हा प्रकल्प एक अत्यंत उपयुक्त, संवेदनशील व मोलाची सेवा ठरत आहे. जुलै २०२४ ते जून २०२५ या कालावधीत ३१९ कुटुंबांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. मृत्यूच्या दु:खदप्रसंगी अंत्ययात्रेसाठी वाहनाची चिंता न करता गरजूंना ही सेवा नि:शुल्क स्वरूपात मिळत आहे. या सेवेसाठी आतापर्यंत अतुल लड्ढा, प्रकाशचंद्र लड्ढा, नंदकिशोर अग्रवाल, रामनारायण अग्रवाल, दिनेश लोहिया, प्रवीण झंवर, सीए नितीन तोतला, सीए गोविंदप्रसाद मुंदडा, शिवरतन मुंदडा, विजय राठी, संजय राठी, सतीश राठी, हिम्मतराव शिंदे, रतन बजाज, गणेश सरोदे, दीपक अंभोरे, महावीर गिलडा यांच्यासह अनेक समाजसेवक आणि दानशूर व्यक्तींचे योगदान लाभले आहे. याशिवाय ४० पेक्षा अधिक सामाज बांधव व लायन्स क्लब जालनाच्या सदस्यांच्या एकत्रित प्रयत्नांतून हा स्थायी सेवा प्रकल्प यशस्वीपणे पुढे नेला जात आहे. आगामी काळात या सेवेला अधिक सशक्त, व्यापक व संघटित रूप देण्यात येईल, अशी माहिती राजेश लुनिया व सौ. जयश्री लड्ढा यांनी दिली.



## न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल आणि ज्युनियर कॉलेज या दोन विद्यार्थी यांनी एकाणे स्कॉलरशिप आणि दुसऱ्याने नवोदयपरिक्षा विशेष प्राविण्य मिळवून यश संपादन केले आहे. नमन अरुण भापकर या विद्यार्थ्याने स्कॉलरशिप परिक्षेत यश मिळवून तो स्कॉलरशिप साठी पात्र ठरला आहे तर आर्यन शिवसिंग मीना याने नवोदय परिक्षेत यश मिळवून तो पुढील शिक्षण नवोदय मधे घेण्यास पात्र ठरला आहे.

या दोन्ही विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केल्यामुळे शाळेच्या संस्थाध्यक्ष, नारायणदादा सोळंके.कार्याध्यक्ष, गणेश सोळंके.सचिव,छाया बागल. मुख्याध्यापक,साम वर्गीस. शिक्षक, गोविंद पाठक. संतोष हरकळ.महादेव कदम.दिनेश साठे.गोपीनाथ जगदाळे.रोहित जैस्वाल.खान, अभिषेक,सुरेखा ताजी.पुजा मोरे.दामिनी टाकणखार.राधिका चव्हाण.मंगला वेडेकर.शालू पारखे.ज्योतिका जगताप. ताहिरा शेख.यांच्या उपस्थित त्यांचा संस्थे तर्फे सत्कार करण्यात आला.

सर्व शिक्षकवृंदांनी त्यांचे कौतुक करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# निम्न दुधना जलाशयात कार्यक्षेत्राबाहेरील मच्छिमारांकडून अनाधिकृतपणे चोरुन मासेमारी

**परतूर । प्रतिनिधी -** निम्न दुधना जलाशयात कार्यक्षेत्राबाहेरील मच्छिमारांकडून अनाधिकृतपणे चोरुन मासेमारी करत असल्याचे मापेगाव मच्छीमार सहकारी संस्था मर्या. मापेगाव या संस्थेच्या वतीने सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय जालना यांना सदर संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेरील मच्छीमार निम्नदुधना जलाशयात चोरुन व अनाधिकृतपणे कोळंबी, मासेमारी करत असल्याबाबतची तक्रार दिली होती.

त्याअनुषंगाने सहाय्यक मत्स्य आयुक्त जालना यांनी पोलीस अधीक्षक जालना यांना पत्र पाठव या प्रजनन काळात अनधिकृत मासेमारी करण्याऱ्यावर कारवाई करण्याचे म्हंटले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मापेगाव मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या. मापेगाव या संस्थेकडे शासन निर्णय दि.०३.०७.२०१९ नुसार निम्नदुधना जलाशय मापेगाव मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या. मापेगाव या संस्थेस तलाव ठेका आदेश जा. क्र. मत्स्य/भू ०११२०७/११२/३०१/२०२४, दि.३०.०७.२०२४ नुसार ०५ वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या कालावधीसाठी मत्स्यव्यवसायाकरीता ठेक्याने दिला आहे. संस्थेने शासन धोरणानुसार सन २०२५ - २६ या कालावधीचा तलाव ठेका रक्कम व मत्स्यबोटुकली रक्कम नियमानुसार भरणा केलेला आहे.



तलाव ठेका अटी, शर्तीनुसार जी न्ड एच ॲक्वा फार्मींग कंपनी पुणे यांचे समवेत जा.क्र.मत्स्य०११२०३/२८९/४३०/२०२४दि.२६.१०.२०२४ अन्वये पी.पी.पी. करार केला आहे. तसेच सदर संस्था शासन धोरणाप्रमाणे संस्थेचे सभासद व परिसरातील मच्छीमारांना मासेमारी रोजगार उपलब्ध करुन देत आहे. तसेच प्रजनन काळामुळे संस्थेने दि. १८.०७.२०२५ पासून कोळंबी व मासेमारी बंद केलेली असतांना सुद्धा तालुक्याबाहेरील गुंड प्रवृतीचे ५० ते १०० मच्छीमार संगनमत करुन तलाव परिसर करजखेड, वाकडी, पाडळी येथे जवळपास १०० ते २०० लोक झोपडी टाकुन वास्तव्य करत आहे. रात्री बेरात्री कोळंबी, मासे चांरुन सेलू येथील दोन ते चार व्यापाऱ्यांना विकत आहेत. त्यांना संस्थेचे कर्मचारी यांनी संबंधीत मच्छीमारांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केल्यास संस्थेच्या कर्मचाऱ्यांना विनयभंग, जिवे मारण्याच्या तसेच ॲट्रॉसिटी केस करण्याच्या धमक्या देत आहे. अशा प्रकारची संस्थेच्या वतीने तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणाची दखल घेत मत्स्य आयुक्त जालना यांनी पोलीस अधीक्षक जालना यांना पत्र पाठवत या तालुक्या बाहेरील गुंड प्रवृत्तीच्या लोकांना आवर घालावा तसेच त्यांना प्रतिबंध करत त्यांच्यावरती योग्य ती कारवाई करण्याचे या म्हटले आहे.यावर परतूर पोलिस काय कारवाई करतात हे पाहणं महत्वाच ठरणार आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.